आजचा शुभ विचार

""बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-24 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Monday 26 May 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २४ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ सोमवार, दि. २६ मे २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## वैष्णवी हगवणे आत्महत्यांचे प्रकरणात सासरे राजेंद्र हगवणे यांचे बँक लॉकर सील, नीलेश चव्हाणविरुद्ध गुन्हा दाखल

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

वैष्णवी हगवणेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे या दोघांना २८ मे पर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. तर वैष्णवीचा पती शशांक हगवणे, सासू लता, नणंद करिष्मा या तिघांना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. पैशांसाठी सासरच्यांकडून होणाऱ्या छळाला त्रासलेल्या वैष्णवीने गळफास घेत आत्महत्या केली. या प्रकरणात आता पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. बावधन पोलिसांनी हगवणे कुटुंबीयांची कसून चौकशी केली. वैष्णवीच्या बाळाची हेळसांड केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील कलमात वाढ करीत नीलेश चव्हाणलाही आरोपी करण्यात आले आहे. तसेच राजेंद्र हगवणेचे बँकेतील लॉकर सील करण्यात आले आहेत.



वैष्णवीला लग्नात देण्यात आलेले ५१ तोळे सोन्याचे दागिने हगवणे कुटुंबाने बँकेकडे गहाण ठेवले आहेत. सोने गहाण ठेवून कर्ज घेतले आहे. याबाबत बँकेशी पत्रव्यवहार केला असून, गहाण ठेवलेले सोने हे हुंड्यातील असल्याचे कळविले आहे. हगवणे पिता-पुत्रांनी पसार असताना वापरलेल्या दोन लक्झरी कार पोलिसांनी जप्त केल्या आहेत. वैष्णवीच्या बाळाला आणण्यासाठी कस्पटे कुटुंबीय गेले असता नीलेश चव्हाणने पिस्तुलाचा धाक दाखवला होता. या कृतीद्वारे त्याने बाळाच्या जीवाला धोका निर्माण केला म्हणून नीलेश विरोधात पोलिसांनी 'मुलांची काळजी व संरक्षण' या कलमाची वाढ करत गुन्हा नोंदवला आहे. नीलेशला पोलीस शोधत आहेत. याआधी वारजे पोलीस ठाण्यात २०२२ मध्ये नीलेश विरोधात महिलेचे छुप्या कॅमेऱ्याने शूटिंग केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## वाल्मिक कराडला तुरुंगात VIP ट्रीटमेंट दिली जातेय; जामिनावर सुटलेल्या बडतर्फ रणजित कासलेचा दावा

दिपक रोकडे
जालना प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

मस्साजोगचे सरपंच सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड न्यायालयीन कोठडीत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचा विश्वासू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाल्मिक कराडला तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत आहे, असा आरोप जामिनावर सुटलेल्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेने केला आहे. न्यायालयीन कोठडीत असताना स्वतःच्या डोळ्यांनी वाल्मिक कराडला मिळत असलेली विशेष वागणूक बघितली; असे रणजित कासलेने सांगितले.





सोशल मीडियावर पोस्ट करुन त्याने ही माहिती सार्वजनिक केली आहे. वाल्मिक कराडला दररोज तुरुंगामध्ये पोटभर जेवण दिले जाते. चांगल्या कपात गरम चहा मिळतो. जेवणाव्यतिरिक्त एरवी खाण्यापिण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे फरसाण, चिवडे मिळतात. जेवणासाठी त्याला तेल लावलेल्या गरमागरम मऊ लुसलुशीत पोळ्या मिळतात. दर बुधवारी आणि रविवारी पोटभर चिकन दिले जाते. हे सगळे स्वतःच्या डोळ्यांनी बघितल्याचे जामिनावर सुटलेल्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेने सांगितले. तुरुंग प्रशासनाने काही दिवसांतच मला दुसऱ्या कोठडीत ठेवले. मला वाल्मिकच्या हालचाली लगेच कळू नये यासाठी ही खबरदारी घेण्यात आली. एवढे करुनही मी वाल्मिकला मिळणाऱ्या वागणुकीविषयी नाराजी व्यक्त करतोय हे लक्षात आल्यावर मला जामीन मिळावा यासाठी हालचाली झाल्या, असा दावा रणजित कासलेने केला आहे. कासलेवर अॅट्रॉसिटी, फसवणूक तसेच निवडणूक काळातील दोन गुन्हे अशा एकूण चार गुन्ह्यांची नोंद आहे. या गुन्ह्यांमुळेच त्याला पोलीस दलातून बडतर्फ करण्यात आले आहे. नुकताच तो जामीन मिळाल्यामुळे तुरुंगाबाहेर आला आहे. बाहेर आल्यावर सोशल मीडिया पोस्ट करुन रणजित कासले नव्याने चर्चेत आला आहे.

## पूजा खेडकरने UPSC चे सर्व आरोप फेटाळले, शाळेच्या दाखल्यापासून नागरी सेवा परीक्षेपर्यंत सर्व काही सांगितलं

### पूजा खेडकरने नाव बदलून परीक्षा देण्याच्या आरोपाचे केलं खंडन

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

वादग्रस्त माजी प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून तिच्यावर अनेक आरोप करण्यात आले आहेत. त्यापैकी सर्वात मोठा आरोप म्हणजे तिने अनेकदा नाव बदलून यूपीएससीची परीक्षा दिली आहे. ज्यात 12 व्या यूपीएससी परीक्षेत तिला यश मिळाले. यापैकी नऊ वेळा तिने 'पूजा दिलीपराव खेडकर', तीन वेळा 'पूजा मनोरमा दिलीप खेडकर' असं नाव वापरल्याचा, तसेच वडिलांचं कधी 'दिलीप' तर कधी 'दिलीपराव' असं वेगवेगळं नाव वापरल्याचा आरोप केला जात आहे. त्याचबरोबर तिने ओबीसी जातप्रमाणपत्राचा गैरवापर केल्याचा देखील आरोप होत आहे. यावर तिने पहिल्यांदाच सविस्तर प्रतिक्रिया दिली. पूजा खेडकर ही माजी आयएएस प्रोबेशनर आहे, तिला गेल्या वर्षी बनावट कागदपत्रे आणि गैरवर्तनाच्या आरोपांनंतर सेवेतून काढून टाकण्यात आले होते. खरं तर, UPSC ने जुलै २०२४ मध्ये CSE २०२२ साठी खेडकर यांची उमेदवारी रद्द केली होती, कारण तिने परीक्षेत बसण्यासाठी निर्धारित केलेल्या जास्तीत जास्त प्रयत्नांपेक्षा अधिक वेळा म्हणजे तब्बल 12 वेळा परीक्षा दिली. यासाठी तिने स्वतःच्या आणि तिच्या पालकांच्या वेगवेगळ्या नावांनी अर्ज केला होता. या गोष्टीनंतर, डीओपीटीने तिला सेवेतून निलंबित केले. मात्र, पूजा खेडकरने हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत आणि या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले आहे.

**पूजा खेडकरने केले आरोपाचे खंडन**

पूजा खेडकरने तिच्यावर लावलेले सर्व



आरोप फेटाळले असून, आपली बाजू स्पष्ट केली आहे. "मी पहिल्यापासून पूजा खेडकर हेच नाव वापरलं आहे. यूपीएससी परीक्षा पहिल्यांदा दिली तेव्हा देखील मी हेच नाव वापरलं होतं आणि शेवटच्या वेळी देखील हेच वापरलं. दरम्यानच्या काळात मी फक्त एकच गोष्ट केली की मी माझ्या नावात माझ्या आईचं नाव समाविष्ट केलं. म्हणजे मी पूजा मनोरमा दिलीप खेडकर असं नाव करून घेतलं. २०१४ मध्ये मी गॅझेट नोटिफिकेशनद्वारे कायदेशीररित्या हे नाव बदलून घेतलं. आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री देखील त्यांच्या नावात आईचे नाव लावतात मी कायदेशीररित्या ते नाव लावले आहे". एका युट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत पूजाने सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. पूजा खेडकरने पुढे असे देखील सांगितले की, "मी सर्वांच्या माहितीसाठी सांगते, यूपीएससीच्या अर्जात आपल्या शालेय कागदपत्रांमध्ये जे नाव दिलेलं असतं तेच वापरावं लागतं. माझ्या शाळेच्या कागदपत्रांवर पूजा दिलीपराव खेडकर असं नाव लिहिलं होतं. त्यामुळे तेच नाव पुढेही कायम राहीलं. मात्र २०१४ मध्ये मी कायदेशीररित्या माझं नाव बदलून घेतलं."

**यूपीएससीकडून आईचं नाव लावण्याची परवानी मिळाली : पूजा खेडकर**

पूजा खेडकरने नाव बदलून परीक्षा देण्याच्या आरोपाचे खंडन करताना म्हंटले की, "२०१७ मध्ये यूपीएससीने मला कायदेशीररित्या बदललेलं नाव वापरण्याची परवानगी दिली. २०२१ नंतर मी माझ्या अर्जात आईचं नाव वापरलं. मी पुन्हा एकदा नमूद करते की मी माझं नाव कधीच बदललं नाही. मी केवळ प्रतिज्ञापत्र सादर करून माझ्या आईचं नाव समाविष्ट करण्याची परवानगी मागितली होती. परवानगी मिळाल्यानंतर मी तीन वेळा परीक्षा दिली आणि प्रत्येक वेळी आईच्या नावासह माझं बदललेलं नाव वापरलं. तत्पूर्वी प्रत्येक वेळी मी प्रतिज्ञापत्र सादर केलं आहे.

**पूजा खेडकर प्रकरणानंतर नागरी सेवा परीक्षांमध्ये बायोमेट्रिक अनिवार्य**

पूजा खेडकर प्रकरणानंतर केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) आता नागरी सेवा परीक्षांमध्ये बायोमेट्रिक ओळख प्रणाली अनिवार्य करणार आहे. यासोबतच, यूपीएससी नागरी सेवा परीक्षांमध्ये AI चा देखील वापर होणार आहे. नागरी सेवा परीक्षांमध्ये होणारी फसवणूक आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी यूपीएससीने ही नवीन प्रणाली स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे, जी या वर्षापासून लागू केली जाईल. पूजा खेडकरचे प्रकरण समोर आल्यानंतर यूपीएससीने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, यूपीएससी नागरी सेवा परीक्षांमध्ये बायोमेट्रिक आधारित ओळख प्रणाली लागू करणार आहे. या नवीन प्रणालीअंतर्गत, परीक्षेत बसणाऱ्या उमेदवारांच्या बोटांचे ठसे प्रमाणित केले जातील. यासोबतच, परीक्षेदरम्यान कॉपी रोखण्यासाठी चेहऱ्याची ओळख आणि ई-प्रवेशपत्राचे क्यूआर कोडसह स्कॅनिंग आणि एआय-आधारित सीसीटीव्ही पाळत ठेवणे आवश्यक आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचा शंखनाद, गृहमंत्री अमित शाहांची सभा ठरणार भाजपाची मोठी खेळी

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

नांदेडमध्ये राजकीय वातावरण तापलंय. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची जाहीर सभा नांदेडमध्ये होतेय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुतीतल्या अनेक नेत्यांच्या आक्रमक रणनीतीमुळे भाजपाचा शंखनाद होताना दिसतोय. या पार्श्वभूमीवर भाजपाची रणनीती आणि मराठवाड्यातील राजकीय डावपेच काय असतील ? चला, घेऊ सविस्तर आढावा. नांदेड हे मराठवाड्याचं राजकीय केंद्र. राज्यातल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, देगलूर, भोकर, मुखेड आणि नायगाव या सहाही जागांवर विजय मिळवला. यात भाजपाने चार, तर शिवसेनेने दोन जागा जिंकल्या. मात्र लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे रवींद्र चव्हाण यांनी भाजपाच्या संतुक हंबर्डे यांचा १४५७ मतांनी पराभव केला. त्यामुळे नांदेडमधील मतदारांचा 'स्प्लिट व्होटिंग'चा ट्रेंड समोर आला. मतदारांनी विधानसभेत महायुतीला आणि लोकसभेत काँग्रेसला पसंती दिली. याच नांदेडमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा शंखनाद होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमित शाह यांची ही सभा म्हणजे भाजपाचं शक्तिप्रदर्शन असणार आहे. महायुतीने २०२४च्या विधानसभा निवडणुकीत २३० जागांसह प्रचंड विजय मिळवला होता.आता स्थानिक निवडणुकीतही विजयाची ही परंपरा कायम ठेवण्याचा मोदी सरकारचा मानस आहे.यासाठी अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस



यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी नांदेड प्रतिष्ठेचं केलंय. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित लढण्याचा महायुतीचा विचार आहे. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आधीच घोषित केलीय. मराठवाड्यातील मागासवर्गीय आणि ग्रामीण मतदारांना एकत्र आणणं हाही त्यामागचा एक उद्देश आहे. नांदेडमध्ये विशेषतः ओबीसी आरक्षणाचा मुद्दा महत्त्वाचा आहे आणि सुप्रीम कोर्टाच्या ताज्या निर्णयानंतर ओबीसी आरक्षण पुन्हा लागू होणार असल्याने महायुतीला याचा फायदा होऊ शकतो. भाजपाची रणनीती ही स्थानिक नेत्यांना संधी देत ग्रामीण भागात आपली पकड मजबूत करण्याची आहे. मराठवाड्यातील दुष्काळ, शेती आणि पायाभूत सुविधांचे प्रश्न यावर महायुती आक्रमकपणे बोलत आहे. अमित शहा यांच्या सभेतून विकास आणि स्थैर्य या मुद्द्यांवर भर दिला जाण्याची शक्यता आहे. याशिवाय, महायुतीने एकनाथ शिंदे यांना प्रशासकीय कामात अधिक सामावून घेत त्यांची नाराजी दूर करण्याचाही प्रयत्न केलाय. त्यामुळे नांदेडसारख्या भागात शिवसेनेचे स्थानिक नेते पुढाकार घेऊ शकतात. महायुतीने मराठवाड्यातील स्थानिक निवडणुकीत यश मिळवायचा चंग बांधलाय. त्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षांना बरोबर घेऊनच पुढे जावं लागेल. नांदेडमध्ये भाजपा आणि शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांचा मोठा प्रभाव आहे. नांदेडमधील सभा ही एक प्रकारे महायुतीच्या एकजुटीचं प्रदर्शन ठरणार आहे. यात मतदारांचा मूड पाहूनच महायुतीला रणनीती ठरवावी लागणार आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा प्रचार, लाडकी बहीण योजनेचा वापर योग्य प्रकारे करावा लागणार आहे. भाजपाला प्रत्येक मतदारसंघात रणनीती आखावी लागेल. नांदेडमधील अमित शाह यांची सभा ही केवळ निवडणूक प्रचारापुरती मर्यादित नाही, तर ती महायुतीच्या एकजुटीचं आणि मराठवाड्यातील वर्चस्वाचं प्रदर्शन आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभेत दमदार कामगिरी केली, मात्र स्थानिक निवडणुकीत यश मिळवण्यासाठी त्यांना काँग्रेसच्या आव्हानाला तोंड द्यावं लागेल. दुसरीकडे काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केलेल्या अशोक चव्हाण यांचा नांदेड आणि मराठवाड्यातील प्रभाव लक्षात घेता त्यांचा महायुतीला काय फायदा होतो हेही पाहणं महत्त्वाचं आहे. जिल्हा परिषद, सोळा पंचायत समित्या, पंधरा नगर परिषदा, एक महापालिका आणि चार विधानसभा मतदारसंघांवर अशोक चव्हाण यांच्या समर्थकांचं वर्चस्व आहे. त्यामुळे नांदेडमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्याचा मोठा फायदा महायुतीला होण्याची शक्यता आहे. अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नांदेडमध्ये होणारा हा शंखनाद मराठवाड्यातील राजकीय समीकरणं बदलणार का ? याचं उत्तर येत्या काही महिन्यांत मिळेल.

## जपानला मागे टाकत भारत झाला जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

जपानला मागे टाकत भारत जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था झाला आहे. भारत वेगाने आर्थिक प्रगती करत आहे. भारताच्या पुढे आता केवळ अमेरिका, चीन आणि जर्मनी हे तीन देश आहेत. नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांनी ही माहिती दिली. नीती आयोगाच्या दहाव्या गव्हर्निंग काउन्सिलच्या बैठकीनंतर सुब्रह्मण्यम यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांनी भारतीय नागरिकांना ही आनंदाची बातमी दिली. भारताची अर्थव्यवस्था आता चार ट्रिलियन डॉलरची अर्थात चार हजार अब्ज डॉलर म्हणजेच ३४० लाख कोटी रुपयांची झाली आहे. जगावर मंदीचे सावट आहे. अनेक देशांचे संघर्ष सुरू आहेत. या संघर्षांचा



अर्थकारणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. अमेरिकेने वेगवेगळ्या देशांवर परस्पर आयात शुल्क अर्थात रेसिप्रोकल टॅरिफ लावले आहे. काही मुद्यांवर चीन आणि युरोपियन महासंघ विरुद्ध अमेरिका असे टॅरिफ वॉर सुरू आहे. या प्रतिकूल वातावरणात भारताच्या अर्थव्यवस्थेची भरभराट होत आहे. भारताने झपाट्याने प्रगती करत जपानला मागे टाकत जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था होण्यापर्यंत मजल मारली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अर्थात आयएमएफच्या माहितीचा संदर्भ देत भारत जगातली चौथी मोठी अर्थव्यवस्था झाल्याचे नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम म्हणाले. भारताने जपानला मागे टाकल्याचे त्यांनी सांगितले. देशाच्या विकासाची गती कायम राहिली अथवा वाढली तर पुढील दोन ते तीन वर्षात भारत जर्मनीला मागे टाकून जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था होईल असा विश्वास बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम यांनी व्यक्त केला. याआधी शनिवार २४ मे रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे नीती आयोगाच्या दहाव्या गव्हर्निंग काउन्सिलची बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत त्यांनी देशातील सर्व राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी काम करण्याचे आवाहन केले.

संपादकीय

# "विज्ञानव्रती" डॉ. जयंत नारळीकर

बहुसंख्य लोक तोंडाने आपण खूप विज्ञानवादी आहोत असे सांगतात, पण कोणत्याही शुभकार्याला नारळ फोडण्याचे आणि कसलेही धर्म कार्य करतात. वर त्यांचे समर्थन असे असते की, मी तर विज्ञानवादी आहेच पण माझी पत्नी किंवा आई किंवा घरच्यांच्या समाधानासाठी हे करावे लागते. त्या ढोंगाच्या बतावणीला डॉ. जयंत नारळीकर यांनी आयुष्यभर चपखलपणे नाकारले आणि खरा विज्ञानव्रती काय असतो हे दाखवून दिले. प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचे मंगळवारी पुण्यात सकाळी निधन झाले. त्यांच्या नावावर अनेक सिद्धांतांचे जन्म आहेत तसेच बिग बँग थिअरी आणि गुरूत्वाकर्षण सिद्धांत विकसित करण्याचे संशोधन कार्य आहे. नारळीकर यांनी वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी पद्मभूषण पुरस्कार मिळवला. नारळीकर यांचे कार्य एवढ्यापुरते सीमित नाही. त्यांनी अनेक पुरस्कार पटकावले आणि त्यांच्या अधिपत्याखाली आययूसीएने उत्कृष्टता केंद्र म्हणून ख्याती मिळवली. त्यांना अनेक सन्मान मिळवले, पण त्यांच्या बिग बँग थिअरीच्या संशोधनासाठी ते जगभर गणले गेले. बिग बँग थिअरी म्हणजे अशी आहे की, आपले युनिव्हर्स हे अशा लहान बिंदूपासून सुरू झाले आणि ते विस्तारत आज आहे तसे व्यापक आणि विशाल झाले. त्यांनी फ्रेड हॉयल यांच्यासोबत ग्रॅव्हिटी थिअरीवर काम केले आणि एक सिद्धांत विकसित केला जो आज नारळीकर- हॉयल सिद्धांत म्हणून प्रख्यात आहे. हीच आहे ती कॉन्रफर्नल ग्रॅव्हिटी थिअरी. विज्ञानाचे अवडंबर न माजवता वैज्ञानिक दृष्टिकोन सदासर्वदा बाळगणारे डॉ. जयंत नारळीकर हे विज्ञानाचे व्रती होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

डॉ. नारळीकर यांचे विज्ञानातील कार्य अतुलनीय आहे आणि त्यांचे सिद्धांत तर बेजोड आहेत. त्यांनीच विकसित केलेला हॉयल नारळीकर गुरूत्वाकर्षण सिद्धांत हा आज जगभरच्या शास्त्रज्ञांसाठी आदर्श होऊन बसला आहे. त्यांचा कॉन्फर्नल ग्रॅव्हिटी सिद्धांत हा विकसित केला आणि तो आईनस्टाईनच्या सापेक्षता सिद्धांताला वेगळा दृष्टिकोन देतो. पण नारळीकर यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी रूक्ष विज्ञानाला आपले मानले नाही, तर त्याला लोकांमध्ये लोकप्रिय बनवण्यासाठी विज्ञान कथा आणि कादंबऱ्या लिहिल्या. त्याही अतोनात लोकप्रिय झाल्या आणि त्यातीलच एक आहे 'वामन परत न आला' ही कादंबरी. केवळ विज्ञानकथा हा समाजाशी फटकून वागणारा असू शकत नाही, तर त्याने समाजासाठी त्याचे योगदान दिले पाहिजे हे नारळीकर यांनी पटवून दिले. त्यासाठी त्यानी विलक्षण विज्ञानकथा लिहील्या आणि त्या लोकप्रिय झाल्या. आज विद्यार्थी इंजिनियर किंवा डॉक्टर होण्याच्या मागे लागला आहे किंवा कॉम्प्युटरमध्ये एखादी पदवी मिळवून मोठी नोकरी पटकावायची हेच त्याचे स्वप्न राहिले आहे. ते नारळीकर यांना शक्य असते, तर त्यांनी ते केलेही असते. पण त्यांनी तसे केले नाही. विज्ञानाचा उपयोग समाजासाठी करायचा या हेतूने ते पछाडले गेले आणि त्यातून त्यांनी विज्ञानकथा लिहील्या. आज प्युअर सायन्स घेऊन जाणारे किती विद्यार्थी आहेत याचे संशोधन करावे लागेल. विद्यार्थ्यांना दहावीला ९० टक्के गुण मिळाले किंवा बारावीला मेरिटमध्ये पास झाला की लगेच त्याला इंजिनियर होण्याची स्वप्ने पडतात. पण बेसिक सायन्सेसकडे विद्यार्थी वळतच नाहीत. ही खंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विज्ञान संमेलनात बोलून दाखवली होती. आजच्या या प्रश्नाला नारळीकरांचे आयुष्य हे चांगले उत्तर आहे. नारळीकर यांचा जन्म रँगलर नारळीकर यांच्या घरात झालेला. त्यांची आईही संस्कृत स्कॉलर होती. त्यांनी विज्ञानाचे संशोधन हाती घेतले आणि प्रचंड कार्य केले. डॉ. नारळीकर यांनी अनेक पुरस्कार आणि सन्मान मिळवले आणि त्यात पद्मविभूषण, तसेच वयाच्या २६ व्या वर्षी मिळालेला पद्मभूषण हा पुरस्कार ही आहे. पण त्यानी साहित्यात जे कार्य केले त्याला तोड नाही. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभला आणि त्यांनी विज्ञानकथा वाचकांमध्ये लोकप्रिय बनवल्या. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायला हवेत. कारण विज्ञानकथा म्हणजे वाचकांच्या डोक्यावरून जायला हवी अशी जी धारणा होती ती नारळीकर यांनी पुसून टाकली. जयंत नारळीकर हे कोणतेही दंभ न करताही विज्ञानाचे शिलेदार होते आणि त्यांनी ते कार्य आपण होऊन स्वीकारले होते आणि ते शेवटपर्यंत पुढे नेले. कोणताही वैज्ञानिक नम्र असतो आणि त्याचे नारळीकर हे मूर्तिमंत रूप होते. त्यानी कधीही आपल्या संशोधनाचा दंभ मिरवला नाही. नाही तर आपल्याकडे थोडे यश मिळाले, तर अर्ध्या हळकुंडात पिवळे होणारे आणि इतरांना शहाणपण शिकवणारे आणि धर्म नाकारणारे वैज्ञानिक आहेत. पण विज्ञान हे खरेखुरे विज्ञान असते आणि त्यात दुसरे काही भेसळ नको असे मानणारे जयंत नारळीकर होते असे आदराने म्हणावे वाटते. त्यांचा वाढदिवस हा विज्ञानकथा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी खगोलशास्त्रज्ञ म्हणून कार्य केले त्याला जगात कुठेही तोड नाही. विज्ञान हे अंतिम ज्ञान नाही हे अध्यात्मिक गुरूंइतकेच नारळीकरांसारखे व्रतस्थ ही जाणत. इतिहासात साक्ष आहे की कोपर्निकसने अगोदर सूर्य पृथ्वीभोवती फिरतो असे संशोधन केले होते. त्याला जगमान्यताही मिळाली होती. तो सिद्धांत नाकारणाऱ्या अनेकांना फाशी देण्यासाठी तत्कालीन समाजाने काढले होते. पण कोणतेही विज्ञान हे परिपूर्ण कधीच नसते आणि त्यात नवनवीन संशोधन होत असते. त्यामुळे कालांतराने कोपर्निकसचा सिद्धांत चुकीचाच ठरला. नारळीकर हे स्वतःला अंतिम ज्ञान मिळाले आहे हे समजत नसत. तसे ते कोणत्याही शास्त्रज्ञांनी समजू नये. म्हणून तर त्यांना व्रतस्थ शास्त्रज्ञ म्हटले जाते.

# नादुरूस्त ट्रांसफार्मर दुरूस्त करा:- शिवबा संघटनेची मागणी

## महावितरण कंपनीकडून मिळाला सकारात्मक प्रतिसाद

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------



पारनेर तालुक्यातील अनेक भागात अनेक ठिकाणी ट्रांसफार्मर ची आवश्यकता अतिशय बिकट आहे ट्रांसफार्मर मध्ये काम करायचं असल्यास त्या ठिकाणी जाण्याची ही भीती वाटत आहे. फ्युज किंवा दिवा गेल्यानंतर कुठलाही वायरमेन उपलब्ध होत नाही त्यामुळे शेतकरी बांधवांना स्वतःच ही कामे करावी लागत आहेत आणि म्हणूनच हे सर्व ट्रांसफार्मर योग्य रीतीने दुरुस्त होण्याबाबतची भूमिका संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी मांडले उपअभियंता हातोडकर साहेब यांनी याबाबत निश्चित तोडगा काढण्याचा प्रयत्न आम्ही करू त्यासाठी काही ट्रान्सफॉर्मर ला बॉक्स आम्ही बसू व त्याचे निरीक्षण काही दिवस केल्यानंतर ते जर सुस्थितीत राहिल्यानंतर पुढील बॉक्सही आम्ही बसू अशी भूमिका आणि असे आश्वासन शिवबा संघटना पदाधिकारी यांना दिले. मात्र संघटनेने केलेल्या या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास संघटनेच्या वतीने पारनेर येथील कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचेही संघटनेच्या वतीने सांगण्यात आले शेतकरी बांधवांच्या सुरक्षेतेच्या बाबतीत कुठलीही तडजोड संघटना सहन करणार नसल्याचेही अनिल शेटे यांनी सांगितले. संघटनेने केलेल्या आव्हानानुसार तीस ते चाळीस गावातील तरुण शेतकऱ्यांनी आपल्या आपल्या भागातील नादुरुस्त ट्रांसफार्मर चे फोटो संघटनेकडे पाठवले आहेत ते सर्व ट्रांसफार्मर लवकरात लवकर दुरुस्त करण्याची भूमिका वीज वितरण कंपनीने घ्यावी ही विनंती ही अधिकाऱ्यांना करण्यात आली.यावेळी पारनेर नगर विधानसभा आमदार आदरणीय काशिनाथ जी दाते सर व उपअभियंता हातोडकर साहेब यांना निवेदन देण्यात आले यावेळी शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे ,शांताराम पाडळे, ठकाराम खोडदे, विकास मोरे ,मच्छिंद्र लामखडे, जयराम सरडे , अविनाश लामखडे, निखिल लामखडे , निलेश दरेकर , उत्कर्ष जगदाळे, काशिनाथ वाजे , वैभव गाडीलकर , गणेश साळुंखे, किरण बडे ,संतोष बडे , महेश मदगे, विजय मदगे, उमेश जाधव, दत्ता टोणगे , चंद्रशेखर ढवण, रोहिदास तोडगे , राहुल मोरे , महेंद्र आढाव, आधी सहकाऱ्यांच्या सह्या निवेदनावर आहेत.

# शेतकऱ्यावरील खोटे गुन्हे रद्द करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



शिरूर तहसीलदार बाळासाहेब मस्के यांच्या मनमानी आणि अन्यायकारक कारभाराविषयी शिरूर तालुक्यातील जनतेच्या मनामध्ये प्रचंड संताप असून अवैध धंद्यांना पाठीशी घालून शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचा नवीन अध्याय तहसीलदारांच्या माध्यमातून तालुक्यात रचला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच सर्वसामान्य जनता प्रचंड त्रस्त आहे. कोणतीही शहानिशा न करता खोटे गुन्हे दाखल करणे, शेतकऱ्यांची अनेक प्रश्न प्रलंबित ठेवणे या आणि अशा अनेक तक्रारी शिरूर तहसीलदारांच्या बाबतीत आहेत असे जय मल्हार क्रांती संघटनेचे अध्यक्ष तथा उमाजी नाईक महामंडळाचे उपाध्यक्ष दौलत नाना शितोळे यांनी शिष्टमंडळासह महसूल मंत्र्यांची भेट घेऊन हे सर्व प्रकरण राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी त्यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. तसेच शिंदोडी येथील शेतकऱ्यांवर दाखल केलेल खोटे गुन्हे महसूल मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले यावेळी महसूल मंत्री महोदयांनी शिरूर तहसीलदार मस्के यांच्या या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिलेअसून तसेच शिंदोडी येथील शेतकऱ्यांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्याच्या संदर्भामध्ये योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश प्रशासनास दिले. असे यावेळी दौलत नाना शितोळे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले यावेळी चिंचणी चे माजी सरपंच दादासाहेब पवार शिंदोडी चे सरपंच अरुण खेडकर, इंद्रभान ओव्हाळ, इंद्रभान वाळुंज, गंगाराम माने, तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोह्यात बुलडाणा अर्बन ची बैठक संपन्न; संस्थापक अध्यक्ष भाईजी मा. श्री राधेश्यामजी चांडक यांनी केले मार्गदर्शन

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



शेतकरी, व्यापारी, उद्योजक आदींसाठी पर्वणी ठरलेल्या लोहा येथील बुलडाणा अर्बन को -आॅप क्रिडेट सोसायटी शाखा लोहा ची बैठक दि.२४-०५-२०२५ रोजी संस्थेचे संस्थापक मा.भाईजी राधेश्याम चांडक यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी संस्थेच्या संचालक श्री किशोरजी केला, मां. श्री नंदकिशोर झंवर, मा. मंत्री सर, विभागीय व्यवस्थापक श्री प्रफुल्ल संचेती यांच्या उपस्थीत बैठक संपन्न झाली.

लोहा येथील बुलडाणा अर्बन को -आॅप क्रिडेट सोसायटीचे नरबा पाटील काॅम्पलेक्स येथील नुकतेच नवीन इमारतीत स्थलांतर झाले. या नुतन इमारतीची पाहणी बुलडाणा अर्बन चे संस्थापक अध्यक्ष मा.भाईजी राधेश्याम चांडक यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले.

तसेच बुलडाणा अर्बन च्या ठेवीदार, कर्जदार, सभासद व बँकेचे कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय व्यवस्थापक प्रफुल्ल संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा शहराच्या परंपरेनुसार शाखा लोहा चा वतीने भाई राधेश्याम चांडक यांचा लोहा शहरातील परंपरेनुसार खारीक खोबऱ्याचा हार घालून सत्कार करण्यात आला तसेच यावेळी नगरसेवक श्री संभाजी पा. चव्हाण मनसे अध्यक्ष गजानन पा. चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर पाटील पवार, महेश अर्बन बँक लोहा शाखेचे अध्यक्ष राम वट्टमवार, दिगांबर देबवार, राजू बोडके,महावीर राजमाने, विक्रम घंटे, विपुल घंटे, ज्येष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे, शिवराज पा. पवार, विलास सावळे, संजय कहाळेकर, विनोद महाबळे, भगवान चव्हाण, मुख्याध्यापक बालाजी असुरवाड, पांडुरंग रहाटकर, काशिनाथ शेटे, राजु , संजू, गोविंद जाधव, सीताराम जाधव, धनंजय गुंडाले, व.शाखा व्यवस्थापक नांदेड श्री भारत चव्हाण, शाखा व्यवस्थापक श्री केशव शेटे, सहा.शा.व्यवस्थापक ऋषीकेश खरात, ठेवीदार व कर्जदार सभासद, अल्पबचत प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. सर्वांनी भाईजी राधेश्याम चांडक यांचा सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# साक्री तालुक्यात घरकुल लाभार्थ्यांसाठी तहसीलदारांकडून वाळू पास वितरणास सुरुवात

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



महाराष्ट्र शासनाच्या वाळू धोरण २०२५ आणि महसूल व वन विभागाच्या २० एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार, साक्री तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांना घरपोच वाळू पास वाटप करण्याची महत्त्वपूर्ण योजना आज प्रत्यक्षात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन साक्रीचे तहसीलदार साहेबराव सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले.

शासनाच्या या निर्णयानुसार, घरकुल उभारणीसाठी पात्र लाभार्थ्यांना ५ ब्रास वाळू घरपोच मिळणार आहे. घरकुल उभारणीदरम्यान वाळू मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, शासनाने पर्यावरण अनुमती प्राप्त वाळू गटामधून स्थानिक वापरासाठी वाळू उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

या योजनेची अंमलबजावणी २६ मार्च २०२० च्या शासन परिपत्रकातील अनुक्रमांक चारच्या तरतुदीनुसार केली जात आहे. गटविकास अधिकाऱ्याकडून प्राप्त लाभार्थ्यांच्या यादीच्या आधारे, ऑफलाईन स्वरूपात वाळू पास वाटप करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे घरकुल बांधणी प्रक्रियेला नवसंजीवनी मिळणार असून, अनेक गरजू कुटुंबांना मोठा आर्थिक आणि तांत्रिक दिलासा मिळेल. शासनाच्या या उपक्रमामुळे गरजूंना त्यांच्या हक्काच्या निवाऱ्याचे स्वप्न साकार करण्यास मदत होणार असून, स्थानीय स्तरावर सकारात्मक बदल घडवून आणणारा हा निर्णय ठरणार आहे.

शासनाच्या या पुढाकाराचे अनेकांनी स्वागत केले असून, स्थानिक प्रशासन आणि विभागीय यंत्रणा या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सज्ज झाल्या आहेत. “ ही योजना लाभार्थ्यांसाठी केवळ सहाय्य नव्हे, तर स्वाभिमानाने जगण्याच्या अधिकारासाठीचा एक मोठा टप्पा आहे,” असे मत स्थानिक अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# आ. अंतापूरकर यांच्या प्रयत्नांना यश

## देगलुर आगारात नव्या बसगाड्यांचे लोकार्पण, प्रवासी सुविधेला चालना

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------

मतदारसंघातील नागरिकांच्या प्रवास व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी आमदार जितेश अंतापूरकर यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, देगलुर बस आगारासाठी नव्या दहा बसगाड्यांना मंजुरी मिळाली आहे. यापैकी सहा बसगाड्या नुकत्याच आगारात दाखल झाल्या असून त्यांचे लोकार्पण मोठ्या उत्साहात पार पडले. या लोकार्पण सोहळ्यास भागातील प्रमुख पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या नव्या बसेसच्या आगमनामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना प्रवासासाठी अधिक सोयीच्या व नियमित सेवा उपलब्ध होणार आहेत.आगामी काळात उर्वरित बसेस देखील लवकरच आगारात दाखल होणार असून, संपूर्ण मतदारसंघात प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, नव्या बसेसमुळे नागरी सुविधा बळकट होणार आहेत.

# सामोडे येथे' विहीर चोरीस गेली!' म्हणत पाणीटंचाईने महिलांचा रास्ता रोको, महामार्गावर दीड तास कोंडी; पोलीस प्रशासनाची धावपळ

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------------



सामोडे ग्रामपंचायतीच्या घोडमाळ परिसरातील तीव्र पाणीटंचाईमुळे संतप्त महिलांनी आज पुन्हा एकदा रास्ता रोको आंदोलन केले. परिसरातील पाणीपुरवठा करणारी विहीरच 'चोरीस गेली' असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे, ज्यामुळे पाणी योजनेतील मोठ्या भ्रष्टाचारावर पुन्हा एकदा बोट ठेवले जात आहे. दीड तास चाललेल्या या आंदोलनामुळे पोलीस प्रशासन, सरपंच, उपसरपंच रावसाहेब घरटे आणि ग्रामसेवक लाड भाऊसाहेब यांची मोठी धावपळ उडाली, तर महामार्गावर दोन्ही बाजूंनी २ किलोमीटरपर्यंत वाहतूक ठप्प झाली होती.

### फसलेली योजना आणि जनतेचे हाल

मे २०२४ मध्ये सुरू झालेली नवीन पाणीपुरवठा योजना पूर्णतः निकामी ठरली असून, त्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. नियोजनाशिवाय आणलेल्या या योजनेत थेट मेन लाईनला अनेक ग्रामपंचायत सदस्य आणि इतरांनी बेकायदेशीर नळजोडण्या घेतल्याने पाणी कमी दाबाने येते. पाणी वितरण करणारा कर्मचारी पगाराचे कारण देत पाणी सोडण्यास टाळाटाळ करत आहे. घोडमाळ परिसरात १०-१५ दिवसांपासून पाणी आले नसल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. सरपंच आणि ग्रामसेवक तक्रारींची दखल घेत नाहीत, उलट "तुमची रडकथा नेहमीचीच आहे" असे उत्तर देतात, असा महिलांचा आरोप आहे.



### आश्वासन आणि पुढील इशारा

दीड तासाच्या रास्ता रोको आंदोलनानंतर सरपंच आरती भारुड, जि. प. सदस्य दीपक भारुड, उपसरपंच रावसाहेब घरटे आणि ग्रामसेवक लाड भाऊसाहेब यांनी चार-पाच दिवसांत नियमित पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. जि. प. सदस्य दीपक भारुड यांनी जलजीवन योजनेचे काम ८ दिवसांत सुरू न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्याचा इशारा दिला.

ग्रामस्थांनी सामोडे ग्रामपंचायतीला हा परिसर पिंपळनेर नगर परिषदेला जोडून पाणी समस्येतून मुक्त करण्याची मागणी केली आहे. पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महिला व ग्रामस्थांनी दिला आहे.

# सटाणा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, उपसभापतींचा सत्कार

## शेतकरी नेते बिंदू शेठ शर्मा यांचाही झाला सत्कार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------





सटाणा बाजार समिती निवडणुकीत नाट्यमय घडामोडीनंतर सभापती उपसभापती यांची निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित सभापती सिंधुताई सोनवणे उपसभापती हरी जाधव संचालक राहुल सोनवणे, निंबा वाढले, शेतकरी नेते बिंदूचे शर्मा यांच्या सत्कार माजी जिल्हा परिषद सदस्य मीनाताई मोरे व ओबीसी सेल भाजप जिल्हाध्यक्ष सुरेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला. याप्रसंगी खुशाल मोरे, भरत अहिरे, जिभाऊ बोरकर धनजी मोरे, शिवाजी मोरे, बाळकृष्ण मोरे, माजी सरपंच अनिता मोरे, सुरेश अहिरे, नरेंद्र मोरे, नंदलाल अहिरे, अण्णा अहिरे, संजय पवार सह आदी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# JEE/NEET/MHT-CET 2025-27 परीक्षापूर्व ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता अर्जाला मुदतवाढ

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------




महाज्योती संस्थेमार्फत JEE/NEET/MHT-CET २०२५-२७ परीक्षापूर्व ऑनलाईन प्रशिक्षण राबविण्यात येत आहे. सदर योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.१५/०५/२०२५ रोजी लिंक प्रसिध्द करण्यात आलेली असून विद्यार्थी अर्ज देखील या कार्यालयास सादर करीत आहे. सदर प्रशिक्षणाकरिता अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येते कि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इयत्ता १० ला ६० % व शहरी भागातील विद्यार्थ्यांना ७० % गुण असणे आवश्यक आहे. महाज्योती कार्यालयास उपलब्ध निधी व मा. संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार निर्धारीत विद्यार्थी संखेच्या प्रमाणात प्राप्त अर्जापैकी गुणानुक्रमे पात्र विद्यार्थांची निवड करण्यात येईल तसेच सदर योजनेकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी व यापूर्वी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना अर्जात दुरुस्ती (वैध नॉन क्रेमिलेयर, बोनाफाईड प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड) करण्याकरिता दि.२०/०६/२०२५ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

# साक्री तालुक्यात खासगी मार्केटचा सुळसुळाट; व्यापारी मालामाल शेतकरी कंगाल

## श्री संजय भदाणे धुळे जिल्हाध्यक्ष कांदा उत्पादक शेतकरी संघटना

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



सध्या साक्री तालुक्यात खासगी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा झपाट्याने सुळसुळाट होत असून, प्रत्येक गावाच्या कोपऱ्यात खासगी मार्केट सुरू होत असल्याचे चित्र दिसून येते. यातून हे स्पष्ट होते की खासगी मार्केट्सद्वारे व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात नफा कमावण्याची संधी मिळत आहे आणि सर्वाधिक धोक्यात आहे तो शेतकरी वर्ग. खासगी मार्केटमध्ये कुठलाही शासकीय दर किंवा नियमांचा बंधनकारक अंमल नसल्यानं व्यापाऱ्यांना मनमानी करण्यास मोकळं रान मिळालं आहे. यामध्ये वजनात घोटाळे, दरामध्ये फरक, वेळेवर पैसे न मिळणे अशा अनेक तक्रारी आढळून येत आहेत. पण यावर कोणतीही ठोस कारवाई होत नाही, कारण अनेक ठिकाणी हे खासगी मार्केट स्थानिक राजकीय पुढाऱ्यांच्या छत्रछायेखाली चालत असून त्यांचे वैयक्तिक आर्थिक हितसंबंध यात गुंतलेले आहेत.

### शेतकऱ्यांवर दुहेरी संकट

एकीकडे नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संकटात आहेच, त्यात अशा खासगी मार्केटच्या वाढत्या प्रभावामुळे 'बळीराजा' मानवनिर्मित संकटालाही सामोरा जात आहे. यातून शेतकऱ्यांच्या कष्टाचे शोषण होत असून त्याला योग्य मोबदला मिळत नाही.

### शासकीय यंत्रणांची उदासीनता

या सगळ्या प्रकारावर कृषी उत्पन्न बाजार समिती (A P M C), कृषी विभाग, जिल्हा प्रशासन, तसेच न्यायालयीन यंत्रणा यांची जबाबदारी आहे. परंतु आजवर या बाबतीत कोणतीही ठोस पावले उचललेली दिसत नाहीत. मूल्य निर्धारण, दर नियंत्रण, वजन मोजणी यंत्रणा, तसेच परवाने नोंदणी व देखरेख हे सर्व बाबी शासनाच्या नियंत्रणात असायला हव्यात. जिल्हा प्रशासनाला आणि कृषी विभागाला नम्र विनंती करण्यात येते की, खासगी मार्केटवर कडक कारवाई करून शेतकऱ्यांचे हक्क आणि हित जपले जावेत. कृषी उत्पन्न बाजार कायदा, तसेच मूल्य शृंखला नियंत्रण नियम २०२० याअंतर्गत तपास करून अवैध बाजारपेठा बंद कराव्यात. शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून देशाचा कणा आहे. त्यामुळे त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळावा, हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

# केंद्र सरकारच्या उदासीनतेने कांदा उत्पादक शेतकरी मेटाकुटीला

## शासन शेतकऱ्यांच्या आत्महत्येची वाट पाहतआहे का?

## नाफेड मार्फत कांदा खरेदी कधी सुरू होणार? श्री संजय बच्छाव

श्री प्रवीण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



श्री भारत दिघोळे
संस्थापक अध्यक्ष: महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना



श्री संजय बच्छाव
साक्री तालुका उपाध्यक्ष :महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना

मे महिना संपत आला तरी केंद्र शासनाच्या भाव स्थिर निधी योजनेअंतर्गत नाफेडची कांदा खरेदी अद्याप सुरू झालेली नाही. यंदा ३ लाख टन कांदा खरेदीचा प्रस्ताव असतानाही प्रत्यक्षात कोणतीही हालचाल दिसत नसल्यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. पारदर्शक पद्धतीने खरेदी व्हावी, ही शेतकऱ्यांची अपेक्षा असताना केंद्र आणि राज्य शासनाचे या विषयाकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. मागील वर्षीही ५ लाख टन कांदा खरेदीचे लक्ष्य ठरवले असले तरी ते पूर्ण झाले नव्हते. नाफेड आणि एनसीसीएफ या संस्थांनी शेतकरी उत्पादन कंपन्यांच्या माध्यमातून थेट शिवारातून खरेदी केली. मात्र या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याने अनेक गैरव्यवहार उघडकीस आले होते. यंदाही खरेदी कधी सुरू होणार, कुठे आणि कशा पद्धतीने होणार याबाबत कोणतीही स्पष्टता नसल्यामुळे कांदा उत्पादकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

> **सदर कांदा खरेदी नाफेडमार्फत तातडीने सुरू करावी व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ५०० रुपयांचे सानुग्रह अनुदान लवकरात लवकर द्यावे.**
> **महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना**

> **"शासनाला कुठून तरी सुद्ध बुद्धी सुचो आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने निर्णय घेऊ"**
> **श्री गंगाधर शिंदे**

अवकाळी पावसामुळे ६० ते ७० टक्के कांद्याचे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने अद्याप कोणतेही ठोस निर्यात धोरण जाहीर केले नाही, ना कुठले अनुदान जाहीर केले. "शासन शेतकऱ्यांच्या आत्महत्येची वाट पाहते आहे का?" असा सवाल आता उघडपणे उपस्थित केला जात आहे. शेतकऱ्यांना प्रतीकात्मक नव्हे तर ठोस आर्थिक मदत आणि कांद्याच्या त्वरित खरेदीची गरज आहे.

# शंभुभक्त प्रणेता देसले यांच्या "स्वराज्य सेवा सप्ताहाची राज्यभर चर्चा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------





दहिवेल येथील सामाजिक कार्यकर्ते तथा खान्देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष व धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समितीचे सचिव प्रणेता देसले यांच्या तर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने स्वराज्य सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे त्या अंतर्गत प्रणेता देसले यांच्या वतीने धुळ्यातील प्रसिद्ध पंजारापोळ गोशाळा येथे गोसेवा करण्यात आली तसेच हात कामगारांना एक्कावन किलो फरसाण वाटप करण्यात आले सदर उपक्रम राबविण्याचा प्रमुख उद्देश म्हणजे यापुढे शिवभक्तांनी शंभूभक्तांनी आदरणीय धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार तळागाळातील प्रत्येक व्यक्तीच्या मनामनात, रक्ताच्या थेंबाथेंबात व प्रत्येक माणसाच्या हृदयात पोहचवण्याचे काम करायला पाहिजे व शक्य होईल त्या पद्धतीने धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंती दिवशी सामाजिक उपक्रम राबवण्याची पद्धत रुजवायला पाहिजे. छत्रपतींच्या विचाराने सर्वांनी हा महाराष्ट्र पुढे नेण्याची सध्याच्या काळात गरज आहे त्यामुळे सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सर्व शिवभक्तांना व शंभूभक्तांना प्रयत्नशील राहावे लागेल व त्या दृष्टीने वाटचाल करावी लागेल हाच खरा उद्देश सदर उपक्रम राबविण्याचा होता असे सामाजिक कार्यकर्ते प्रणेता देसले यांनी सांगितले तसेच भविष्यात देखील धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंती दिवशी आपण वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवू अशी प्रणेता देसले यांनी इच्छा व्यक्त केली. प्रणेता देसले यांच्या अभिनव उपक्रमाचे कष्टकरी, सर्वसामान्य लोकांकडून कौतुक करण्यात येत आहे. या अभिनव उपक्रमाची राज्यभर चर्चा होत आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# झुडपी जंगलांच्या जमिनीवर राजकीय पुढाऱ्यांची संस्थाने; सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे यांना बसणार चपकार!

विदर्भातील सहा जिल्ह्यामध्ये असलेल्या झुडपी जंगलांना वनक्षेत्र समजण्यात यावे असा ऐतिहासिक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरूवार दिनांक २२ मे २०२५ ला दिला.या जंगलांचा उपयोग शासकीय उद्देश वगळता अन्य कामांसाठी करता येणार नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, आणि गडचिरोली या जिल्ह्यामध्ये झुडपी जंगलांचे क्षेत्र आहे.परंतु न्यायालयाच्या निर्णयाने रखडलेली विकास कामे मार्गी लागण्याची शक्यता आहे.राज्यातील झुडपी जंगलच्या जमीनी जास्तीत जास्त राजकीय पुढाऱ्यांनी मोठ्या शिताफीने हस्तगत केलेल्या आहेत.आज आपण विदर्भात अनेक अभियांत्रिकी महाविद्यालय, शाळा-कॉलेजेस, आश्रम शाळा, धर्मदाय रूग्णालये, अन्य संस्थाने यांच्या नावाखाली राजकीय पुढाऱ्यांनी ९० वर्षासाठी १ रूपयांच्या लिजवर जमीनी घेतलेल्या आहेत आणि आज हेच राजकीय पुढारी या हस्तगत केलेल्या जमिनीला आपल्या मालकीची समजतात.आपण आज जे काही शाळा-महाविद्यालय पहातो ते संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांचे असुन अवाढव्य फी व डोनेशन घेऊन करोडोपती झाल्याचे दिसून येतात व ऐश आरामाची जिंदगी जगत आहेत.परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयामुळे या राजकीय पुढाऱ्यांवर चांगलीच चपकार बसण्याचे संकेत दिसत आहे.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येते.कारण ज्या ठिकाणी निसर्ग बागडत होता त्यावर राजकीय पुढाऱ्यांनी वेगवेगळी संस्थाने उभारून आपला कब्जा केला आहे.परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने निसर्गाला मोकळा स्वास घेण्याची संधी नक्कीचं मिळेल असे मला वाटते.झुडपी जंगलातील १९८० नंतरच्या सर्व बांधकामांना अतिक्रमण ठरवत सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षांत अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिला आहे."झुडपी जंगल"जमीन वनीकरणाव्यतिरिक्त इतर कामांसाठी वळवण्याबाबत केंद्र आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात तीन महिन्यांच्या आत आपसात सल्लामसलत करण्याचा निर्देश न्यायालयाने दिला आहे.पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने कोणतेही अनधिकृत बांधकामे न्यायालय खपवून घेणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे.न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करून १२ डिसेंबर १९९६ नंतर झुडपी जंगलाच्या जमिनी वनबाह्य उपयोगासाठी वाटप करण्यात आल्या होत्या याची कारणे आता जमीन वाटप करणाऱ्यां अधिकाऱ्यांना याची यादी द्यावी लागेल.विदर्भात मोठ्या प्रमाणात झुडपी जंगलाची जमीन आहे.ही जमीन महसूल विभागाच्या ताब्यात आहे व तिचा अनेक दशकांपासून आवश्यकतेनुसार रहिवासी, कृषी, सरकारी कार्यालये, सार्वजनिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी उद्देशाकरीता उपयोग केला जात होता.दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२ डिसेंबर १९९६ व दिनांक १३ नोव्हेंबर २००० रोजी आदेश जारी करून कोणत्याही वनजमिनींचा वनबाह्य उपयोग करण्यासाठी वनसंवर्धन कायद्यानुसार केंद्र सरकारची परवानगी घेणे बंधनकारक आहे असे सांगितले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे पूर्व विदर्भातील सहा जिल्ह्यातील ८६४०९ हेक्टर झुडपी जमिनींचा विकास करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.आज देशातच नाही तर संपूर्ण जगात निसर्ग नामशेष होत आहे यांमुळेच मोठ्या प्रमाणात हवामानात बदल होत असुन भुकंप, सुनामी,हिमकडा कोसळने, ज्वालामुखीचा उद्रेक,वनवे लागने, समुद्राची पातळी वाढने असे अनेक महाप्रलय येत आहे किंवा यापुढे यापेक्षा जास्त विक्राळ रूप धारण करू शकते.त्यामुळे जंगल जेवढे वाचविता येईल तेवढे वाचविले पाहिजे.सर्वोच न्यायालयाच्या निर्णयामुळे वनीकरण मोठ्या प्रमाणात होईल याचा फायदा मनुष्य व जंगलातील संपूर्ण पशुपक्ष्यांना सुध्दा होईल.जंगल वाचविण्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाने सरकारला निर्देश दिले की जमीन वन विभागाला हस्तांतरित करण्यासाठी ताबडतोब पावले उचलावीत.सार्वजनिक हिताचा विचार करून जर हे शक्य नसेल तर जागेचे शुल्क वसूल करावे आणि त्याचा वापर वनक्षेत्राचा विकास करण्यासाठी करावा.राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपण आजी-माजी लोकप्रतिनिधी आहात व राज्याच्या ९९ टक्के झुडपी जंगलांच्या जमिनी राजकीय पुढाऱ्यांनी ९० वर्षासाठी १ रूपयांच्या लिजवर घेतल्या आहेत.परंतु वाढते औद्योगिकीकरण व वाढते शहरीकरण यामुळे वनक्षेत्र दिवसेंदिवस ढासळत आहे व कमी-कमी होत आहे आणि वनक्षेत्र वाचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने झुडपी जंगलांचा योग्य निर्णय घेतला आहे.त्यामुळे झुडपी जंगलांवर कब्जा करणाऱ्यांनी प्रामाणिकपणे सरकारला किंवा वनविभागाला जमीनी परत करावी आणि वनक्षेत्रे वाढविण्यासाठी व वाचवण्यासाठी मदत करावी.विदर्भात जर ८६४०९ हेक्टर क्षेत्रात वनक्षेत्र वाढले तर संपूर्ण विदर्भात हिरवागार गालिचा पसरलेला दिसेल आणि हा विदर्भासाठीच नाही तर देशासाठी एक मोलाचा संदेश समजल्या जाईल.सर्वोच्च न्यायालयाने झुडपी जंगलांच्या बाबतीत घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहेच याचे मी मनापासून स्वागत करतो.परंतु सर्वोच्च न्यायालयाने याही पुढे जाऊन देशातील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ वाजवीपेक्षा जास्त असलेल्या जमीनी हस्तगत करून वनक्षेत्राला द्यायला पाहिजे.कारण राज्यासह देशातील राजकीय पुढाऱ्यांच्या एकुण जमीनींचा हिशोब केला तर लाखो हेक्टर जमीन यांच्या घशात आहे यावरही अंकुश लागायला हवे व सरकारने ह्या संपूर्ण जमीनी वनक्षेत्राला देवुन सर्वत्र हिरवागार गालिचा निर्माण केला पाहिजे यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व सर्वत्र वातावरण प्रफुल्लित दिसेल.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# शांताराम बिरारीस यांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड; वाढदिवसाच्या दिवशीच मिळाला गौरव

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत




साक्री तालुक्यातील बल्हाणे हल्ली मुक्काम पिंपळनेर येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले शांताराम रुपचंद बिरारीस यांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली असून, विशेष म्हणजे हा गौरव त्यांना त्यांच्या ६५व्या वाढदिवसाच्या दिवशीच प्राप्त झाला आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यातील निःस्वार्थ योगदानाची ही राष्ट्रीय पातळीवरील अधिकृत दखल आहे. गेल्या चार दशके ते समाजसेवा, शिक्षणविकास आणि ग्रामीण भागातील लोककल्याणासाठी सतत कार्यरत आहेत. कोणत्याही पदाची, प्रसिद्धीची अथवा लाभाची अपेक्षा न ठेवता त्यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली आहे. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना स्थानिक पातळीवर मोठा जनाधार लाभला असून, अनेकांच्या प्रेरणास्थान म्हणून ते ओळखले जातात. या गौरवप्राप्तीनंतर त्यांच्या अर्धांगिनींकडून त्यांना आरोग्यदायी, यशस्वी आणि प्रेरणादायी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. गावकरी, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांनीही त्यांना वाढदिवसानिमित्त आणि पुरस्कारासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेली असून, येत्या काळातही त्यांच्या हातून समाजोपयोगी कार्य अधिक व्यापक स्वरूपात घडो, अशी भावना व्यक्त होत आहे.

# विश्वजीत काळे यांचा डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम रीसर्च फेलोशिपने सन्मान

## पळशीच्या युवकाचे कृषी संशोधन देशात अव्वल !

दिपक रोकडे
छ. संभाजीनगर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत






छ. संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील पळशी खुर्द या लहानशा गावातील विश्वजीत नवनाथ काळे यांची २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील डॉ. एपीजे अब्दुल कलाम रिसर्च फेलोशीपसाठी देशातून प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली. माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे अनुकरणीय आदर्श आणि पूजनीय स्मृती चिरंतन राहण्यासाठी टेरी पॉलिसी सेंटरतर्फे नाविन्यपूर्ण संशोधनासाठी हा अतिशय प्रतिष्ठेचा पुरस्कार दरवर्षी देशभरातून पाच जणांना दिला जातो. जागतिक पातळीवर गुणवत्तेचा ठसा उमटवणाऱ्या आयआयटी, आयआयएससी आणि विद्यापीठं यासारख्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमधील संशोधकांकडून अर्ज मागविले जातात. त्यांतील जटिल निवड प्रक्रियेनंतर देशपातळीवर पहिल्या पाच जणांना हा पुरस्कार देण्यात येतो. या सर्वांमध्ये विश्वजीत काळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. निवडलेल्या विद्यार्थी संशोधकांच्या यादीनुसार विश्वजीत काळे यांच्या एम. एस्सी. (अ‍ॅग्री) संशोधन विषयाचं शीर्षक 'Chitosan For-tified Briquettes Technology: A Climate Resilient Solution for Sustainable Agriculture' असं आहे. त्यांचं संशोधन शाश्वत शेतीसाठी हवामानानुकूल नाविन्यपूर्ण उपाय विकसित करण्यावर केंद्रित असून शेतकऱ्यांच्या जीवनावर आणि पर्यायाने ग्रामीण भारतावर सकारात्मक परिणाम घडवून आणणारं आहे. त्यांच्या या संशोधनामुळे २५ टक्क्यांपर्यंत खताची बचत होऊन कृषी उत्पादन वृद्धी सोबतच माती आणि जलस्त्रोतांचं नुकसान नियंत्रित होतं. शेतीसाठी वाढलेला खर्च, हवामान बदल, दुष्काळ आणि पिकांवर उष्णतेचा ताण हे शेतकऱ्यांच्या वारंवार होणाऱ्या नुकसानीस कारणीभूत असून, हे नुकसान कमी करण्यासाठी त्यांचं संशोधन प्रमुख भूमिका निभावतं. त्यांचं हे अभूतपूर्व संशोधन फेलोशिपच्या ध्येयाशी सुसंगत आहे. विश्वजीत काळे हे राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. करीत आहेत.

> **डॉ. एपीजे अब्दुल कलाम, डॉ. एम. एस. स्वामीनाथन आणि डॉ. वर्गीस कुरियन हे माझे बालपणापासूनच आदर्श असून त्यांच्या नावाचा पुरस्कार मला मिळेल, असं कधीही वाटलं नव्हतं. पण तो मिळाला, याचा आनंद शब्दांपलीकडचा आहे.**
> **विश्वजीत काळे**

## गौरव लेख

# शांताराम बिरारीस आमचे आजोबा – समाजसेवेचा शांत तेज



काही व्यक्तिमत्त्वं असतात, जी आपली वाटचाल शांतपणे करत असतात, पण त्यांचे कार्य इतके ठसठशीत असते की त्याचा प्रभाव समाजाच्या मनावर कायमस्वरूपी कोरला जातो. श्री. शांताराम रुपचंद बिरारी हे असंच एक तेजस्वी, पण विनम्र व्यक्तिमत्त्व.
आज त्यांनी ६५ व्या वर्षात पदार्पण केलं – एका प्रदीर्घ, समर्पित आणि कृतिशील जीवनप्रवासाचा टप्पा. त्यांच्या या विशेष दिवसाला अधिकच गौरव प्राप्त झाला कारण त्याच दिवशी राष्ट्रीय पुरस्कारासाठी त्यांच्या निवडीचं पत्र त्यांच्यापर्यंत पोहोचलं.
त्यांचा प्रवास केवळ व्यक्तिगत उन्नतीपुरता मर्यादित राहिलेला नाही. कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक विकासासाठीचा संघर्ष आणि राजकीय भान या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी निस्वार्थ योगदान दिलं. सदैव हसतमुख, मनमिळावू, सर्वांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, आणि कोणत्याही परिस्थितीत संयम राखणारे आमचे आजोबा बिरारीस हे गावासाठी एक विश्वासाचं प्रतीक ठरले आहेत. भाचा-भाची, भाऊ-बहीण, नातवंडं यांच्यावर त्यांचं अपार प्रेम आहे. आपल्या घरच्यांपासून ते गावकऱ्यांपर्यंत प्रत्येकाला त्यांनी वेळोवेळी दिशा दाखवली, आधार दिला. त्यांचं व्यक्तिमत्त्व संयम, तेज आणि माणुसकीचा संगम आहे. पद, पैसा, प्रतिष्ठा असतानाही त्याचा कधीही गर्व नाही; उलट सत्याला मान देणारे, प्रेमाला जीवन समजणारे, आणि इतरांना दिलासा देणारे बिरारीस एक आदर्श ठरले आहेत. त्यांच्या अर्धांगिनींकडून त्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने दिलेल्या शुभेच्छांमध्ये एक प्रामाणिक प्रार्थना आहे –
ईश्वरचरणी हेच मागणं – की तुम्हाला उत्तम आरोग्य लाभो, आयुष्य सदा आनंदमय, समाधानकारक आणि भरभराटीचं असो."
आज त्यांच्या कार्याची दखल संपूर्ण तालुक्यात घेतली आहे. हा सन्मान केवळ त्यांच्या कर्तृत्वाचा नाही, तर त्यांच्या जीवनमूल्यांचा सन्मान आहे. शांतारामजींच्या जीवनातील हा सुवर्णक्षण प्रेरणादायी आहे – कारण त्यांनी दाखवलेला मार्ग 'सत्कर्म, नम्रता आणि निःस्वार्थ सेवा' यांचं जिवंत उदाहरण आहे. आजच्या या खास दिवशी त्यांच्या कार्यास मन:पूर्वक सलाम, आणि येणाऱ्या काळातही त्यांच्या आशीर्वादाचे, मार्गदर्शनाचे लाभ मिळत राहोत, हीच प्रार्थना.

जान्हवी काकुस्ते ,विलक्षा काकुस्ते

# शैक्षणिक संस्थांसाठी 'एआय' काळाची गरज : डॉ. हितेश शुक्ला

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



आताच्या काळात सर्वच प्राध्यापकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता हा विषय शिकण्याची तयारी ठेवावी व त्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी करावा. तज्ज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत. "कृत्रिम बुद्धिमत्ता' हा विषय सर्व शैक्षणिक संस्थांनी समाविष्ट करणे, काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सौराष्ट्र विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. हितेश शुक्ला यांनी केले. मविप्रच्या आयएमआरटी महाविद्यालयात एआयएमएस यांच्या सहकार्याने आयोजित दोन दिवशीय ९ व्या एआय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मविप्रचे उपसभापती डी. बी. मोगल होते. यावेळी डॉ. शुक्ला म्हणाले, व्यवसाय सुरू करून नफा मिळविण्यासाठी त्यांनी एआयच्या वापरासह अनेक युक्त्या सांगितल्या. नाशिकचा कांदा ७५० किलोमीटरपेक्षा जास्त अंतर पार करून गुजरातमधील महुआ येथे पोहोचतो. तिथे तो मोठा वाहतूक खर्च सहन करून ड्रायरमध्ये कोरडा केला जातो. कांद्याची भुकटी आखाती देशांत १०० पट किंवा त्याहून अधिक दराने निर्यात केली जाते. यातून गुजरात प्रचंड नफा कमावते. महाराष्ट्रातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना नैतिक मार्गाने श्रीमंत बनविण्याचा दृष्टिकोन का विकसित केला नाही? विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांनी यासाठी अभ्यासक्रम का विकसित केले नाहीत? असे प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केले. आयएमआरटीचे संचालक डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात बदलत्या काळानुसार एआयचे महत्त्व सांगितले. त्यांनी राष्ट्रीय परिषदेचे महत्त्व आणि नवीन अभ्यासक्रमांची माहितीही दिली. एआयवरील दोन दिवसांतील आठ सत्रांतील निष्कर्ष अहवाल वाचन संयोजक डॉ. संजय आ. गायकवाड यांनी केले. केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी एआयचा प्रत्यक्ष वापर समाज व राष्ट्राच्या कृषी विकासासाठी किती गरजेचा आहे, हे सांगितले. या परिषदेत देशभरातील तज्ज्ञ, व्यावसायिक, उद्योजक, पत्रकार आणि मान्यवर सहभागी झाले व विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. याबद्दल मविप्र संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे यांनी आयएमआरटीच्या राष्ट्रीय परिषद आयोजनाबद्दल गौरवोद्गार काढले. प्रा. हर्षल देशमुख यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. दुसऱ्या दिवसाच्या प्रथम सत्रात विश्वास देवकर यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेची सांगड मानवी मनावर त्याचे होणारे परिणाम व त्यामुळे उद्भवणाऱ्या समस्या' यावर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी मनावर ती राज्य करू शकणार नाही परंतु काही प्रमाणामध्ये मानवी भावनांमध्ये हस्तक्षेप करू शकेल, असे म्हटले. परिषद यशस्वीतेसाठी डॉ. जयश्री कदम, डॉ. दीपक नांद्रे, डॉ. प्रवीण रायते, वैशाली कदम, प्रा. राहुल ठाकरे, डॉ. जी. एम. अहिरेव डॉ. वर्षा भाबड, प्रा. सीमा जाधव व प्रा. राजश्री वडघुले यांनी वेगवेगळ्या सत्रांचे सूत्रसंचालन केले.

# निघोज येथील कु. साहस कुलदीप वैद्य सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम

## वराळ पाटील फार्मसी कॉलेज च्या वतीने केला साहस चा सत्कार

सचिन जाधव
दैनिक स्वराज्यदूत
पारनेर प्रतिनिधी






पारनेर तालुक्यातील निघोज येथील रहिवासी कु. साहस कुलदीप वैद्य ह्याला नुकतेच घेण्यात आलेल्या सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा २०२५, (AISSEE २०२५) ३०० पैकी २८० गुण मिळवून अनुसूचित जातीत महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवणारा विद्यार्थी ठरला आहे.तसेच संपूर्ण भारतात ६३२ तर अनुसूचित जाती मधून १८ वा क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या उत्तुंग भरारीसाठी सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. AISSEE २०२५ परीक्षा इयेत्ता ६वी आणि ९वी साठी NTA तर्फे दरवर्षी घेण्यात येते. देशातील नामवंत ३३ सैनिकी शाळा विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबत शारीरिक प्रशिक्षण नेतृत्व गुण आणि शिस्तबद्ध जीवनशैली शिकवतात AISSEE उत्तीर्ण होणे म्हणजे या विशेष शिक्षण प्रणालीचा भाग होण्याची संधी मिळते. पुढे एनडीए आणि इतर लष्करी सेवांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतात. कुमार साहस हा बापूसाहेब गावडे विद्यालय टाकळी हाजी येथील विद्यार्थी आहे.साहस याला गणित विषयात १५०पैकी १३८तसेच इंग्रजी विषयात ५० पैकी ४६, माहिती व तंत्रज्ञान विषयात ५०पैकी ४८ व सामान्य ज्ञान विषयात ५० पैकी ४८ गुण प्राप्त झाले आहेत.
साहस चे वडील डॉ. कुलदीप वैद्य हे निघोज येथील सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. तसेच आई सौ.मेघा कुलदीप वैद्य या अंबिका विदयालय देविभोयरे येथे बायलॉजी विषयात प्राध्यपिका म्हणून कार्यरत आहेत. आज वराळ पाटील फार्मसी कॉलेज मध्ये साहस याचा सत्कार माननीय अध्यक्ष रंगनाथ वराळ पाटील यांच्या हस्ते शाल, फेटा आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. साहस हा अतिशय हुशार विद्यार्थी आहे. महाराष्ट्रत प्रथम क्रमांक मिळवून नाव मिळवले आहे. व पुढील वाटचालीस अभिनंदन करतो असे यावेळी बोलताना कॉलेज चे अध्यक्ष रंगनाथ वराळ म्हणाले. तसेच कॉलेज चे सचिव, विराज वराळ पा., प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य, कमलेश पिपाडा सर, संतोष सुपेकर सर, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी पुढील वाटचालीस साहस याला शुभेच्छा दिल्या.

> प्रिय
> साहस दादा,
> AISSEE परीक्षेत ३०० पैकी २८० गुण मिळवून तुझ्या उत्कृष्ट यशाबद्दल हार्दिक अभिनंदन!, ही उपलब्धी तुझ्या कठोर परिश्रम, समर्पण आणि बुद्धिमत्तेचा एक चमकदार प्रकाश आहे. सैनिक स्कूलमध्ये प्रवेश मिळवण्याच्या दिशेने तू एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहेस, आणि हा तुझ्या उज्वल भविष्यासाठी एक स्वर्णिम क्षण आहे. तुझ्या या यशामुळे तुझ्या कुटुंबाला आणि शिक्षकांना अभिमान वाटत आहे, हे नक्कीच. सैनिक शाळेच्या प्रवासात तुला शिस्त, नेतृत्व आणि देशसेवेच्या मूल्यांची ओळख होईल, आणि तुझ्या या यशाने तू सिद्ध केले आहेस की तु यासाठी पूर्णपणे सज्ज आहेस! तुझ्या पुढील प्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा, आणि आम्हाला अभिमान आहे की तू आमच्या देशाची भविष्य उज्वल करशील पुन्हा एकदा तुझ्या या अप्रतिम यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व निर्मल शुभेच्छा.
> **वडील, प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य**
> **आई, प्राध्यपिका सौ. मेघा कुलदीप वैद्य**

## वाचकांच्या लेखणीतून

# "कधी स्पर्शातून, कधी नजरेतून... पण नेहमी सोबत असणारे – जीवनाचे आधारस्तंभ"

लहानपणी हरवले बापाचे छत्र,
कैलासवासी लक्ष्मण लोटन —
माझ्या जीवनातील पहिला आधार,
जरी लवकर गेलेत ते, पण
आठवणींत ते कायम असतात भाराभर,
त्यांच्याच सावलीत माझ्या
आयुष्याची पहिली जडणघडण,
आणि म्हणूनच वाटतं —
त्या हरवलेल्या छत्रातही लाभली दिव्यता
अन् गाठली उंचीची साधना।
पण न वाटली कधी त्यांची कमतरता,
कारण होते एक कुंटुंब प्रेमळ,
ज्यांनी दिला साथ, प्रेम अन् वात्सल्य अमोल।
रूपचंद तुळशीराम आण्णा आजोबा,
शिस्तीचे मूर्तिमंत रूप,
लटकन मा ॅ आजी, मायेचा झरा, थोर संस्कारांचं थोप,
त्यांच्याच कुशीत मोठा झालो मी,
त्यांच्या आशीर्वादांनी आयुष्य उजळून
गेलं खऱ्या अर्थानं खरी।
आई सुशीला बाई, माझ्या जन्माची, प्रेमाची खरी जननी,
जिच्या हृदयात साठले होते दुःख, पण तरी माया कधी न कमी।
तीच्या त्यागातूनच उमललं माझं अस्तित्व,
तीचं ऋण जन्मोजन्मी राहील अजोड, अनमोल व अमरत्व।
जिभाऊ मामा, संयमित, प्रेमळ शब्दांचे शिल्पकार,
कल्पना मामी, मायाळू हसणं, घराचं आधार।
आप्पा मामा, अरुणा मामी, हृदयातले नेहमीचे आधारस्तंभ,
त्यांच्या प्रेमानं दिलं खूप सुख,
विसरवले दुःखाचे सगळे खुणगांठ।
काका मामा, ललिता मामी,
सातत्याने साथ दिली, जणू माया आणि ममतेची जाणीव खरी।
नाना मामा, विजया मामी,
सुख-दुःखाच्या वाटेवर दिला सदैव प्रेमळ हात हाती।
मंगल मावशी, वात्सल्याची समृद्ध मूर्ती,
तीचं हास्य अजूनही मनात घर करतं लवकर।
आबा काका, जणू पित्याचा आधार जिवंत ठेवणारे,
त्यांच्या शांत डोळ्यांत होती प्रेमाची झुळूक भरारे।
सुरेखा मावशी, शांत, समजूतदार,
तीनेही दिलं अनमोल प्रेम सत्कार।
नांद्रेचे काका,
कधी न विसरू शकेन त्यांच्या उपकारांची राखू।
काका शामराव आन्ना, कमलाबाई काकू,
ज्यांच्या शब्दांनी आणि कृतीने उभारी मिळाली नवी,
त्यांनीही दिला आधार पायाभूत,
सर्वांनी मिळून घडवली ही जीवनमूर्ती –
एकसंध, एकमेकांवर ठाम उभं।
हिराबाई काकू – जिच्या मायेची आठवण
अजूनही गंधासारखी दरवळते,
विश्वास बापू काका – ज्यांच्या प्रामाणिक
मार्गदर्शनाने मन शांत वाटते।
ते दोघंही होते जणू जीवनाच्या वाटेवर
न दिसणारे पण आधारभूत दीपस्तंभ,
त्यांचं प्रेम हेच मला ठाम उभं ठेवणारं शाश्वत बळ,
न संपणारा संग।
लहान बंधू नितीन, प्रेमळ, सज्जन,
शांत स्वभावाचा,
त्याच्या जीवनातला दीप —
राजश्री, जिचं हास्यच घरात उजाळा।
लहान बंधू किशोर बडु नाना —
प्रेमळ, समर्पित, माझ्या मनाचा आधार,
सविता – मायेची शाल, त्यांच्या
सहवासात लाभली भरभराट फार।
आणि मग माझ्या हृदयाच्या अजून एका कुशीतले प्रेम —
मावस भाऊ जिजाभाऊ (जगदीश) —
मनमिळावू, शांत, प्रेमळ,
नलिनी वहिनी – त्यांच्या जीवनातील सौम्य प्रकाशपुंज,
त्यांनी नेहमीच दिला भावाचा स्पर्श, घरात प्रेमाचा रंग।
रुपेश, कर्तव्यदक्ष, प्रेमळ मावस बंधू,
राजश्री त्याची साथ — सौंदर्य,
समजूत आणि मायेचं नंदन फुल।
गौरव — उमदं हसणं,
कुटुंबातला विश्वासाचा हात,
गायत्री, त्याच्या आयुष्यातील श्रद्धा,
घरात सौम्य वात।
आमचे पाहुणे कल्पेश दाजी,
ज्या क्षणाला म्हणतात "दादा, दादा!"
त्यांच्या तोंडून आलेला तो शब्द,
माझ्या मनाला सदा साजरा वाटतो सदा।
मंजुषा, मावसभहीण — प्रेमळ, शांत,
तिचं अस्तित्व जणू गुलाबाचं गंध,
तिच्या नकळतही वाहणाऱ्या कल्बीलने
घरात असतो एक सूर सुंदर, सुगंध।
नक्ष — तेजस्वी स्वप्नांचे नंदनवन,
रावी — लाघवी, निरागस, घरातली नाजूक गाणी,
जिच्या डोळ्यात दिसतात स्वप्नांची स्वच्छ गाणी।
अर्णव भाचा — चैतन्याचा वारा,
बुद्धीचा तेजस्वी प्रकाश,
आरुषी भाची — मोहक हास्य,
जिच्या अस्तित्वात लपलेली असते देवाची आभा खास।
सासरे दिलीप दहिते — सौम्य, समजूतदार, संस्कारांचं तेज,
ज्यांचं मार्गदर्शन आमच्या संसाराचा झालं आहे अढळ सेतू,
अडथळ्यांवर विजयाचं द्वार।
सासू निर्मला दहिते — प्रेमळ, संयमी,
जिच्या मायेचं गारुड अजूनही लहानसारखं वाटतं,
तिच्या हास्याच्या सावलीत मिळाली सुवर्णासारखी साथ, जिच्यावर
आयुष्य जपावं असं वाटतं।
२४ एप्रिल २००४, या दिवशी माझं आणि सुवर्णाचं बंधन,
फुललेलं प्रेमाचं नवं पान, जीवनाच्या प्रवासातलं सुंदर परिवर्तन।
त्याच दिवशी मिळालं जीवनाला स्थैर्याचं,
समजुतीचं, प्रेमाचं नवं वलय,
सुवर्णा — फक्त माझी पत्नी नव्हे,
तर संपूर्ण आयुष्याची प्रकाशवाट, एक अनमोल सवय।
आणि माझं वैभव — सुवर्णा, माझी जीवनसाथी,
जिच्या प्रेमानं सजलं माझं आयुष्य, नाती जपली ती हाती।

**संकलन**
**प्रवीण काकुस्ते**
**पिंपळनेर प्रतिनिधी**




"या प्रत्येक आठवणी, या प्रत्येक नात्यांचं चित्र आम्ही शब्दांत
उभं केलं, कारण बाबा, तुमचं जीवन म्हणजे आम्हाला
मिळालेला सर्वात मोठा आदर्श आणि वरदान.
तुमचं प्रेम, संयम, आणि आपुलकीचं
आभाळच आम्हाला प्रेरणा देतं,
ही कविता फक्त शब्दांची माळ नाही
तर आमच्या मनात तुमच्याविषयी असलेल्या
अमर प्रेमाची गाथा आहे."
**जानवी आणि विलक्ष**

तिच्या प्रत्येक स्पर्शानं मिळालं जीवनाला नवं उभारीचं गीत,
ती आहे माझ्या आयुष्यातली अखंड
गूंजणारी मधुर प्रीतीची प्रीत।
मोठे पप्पा — आठवणींच्या कुशीतले चार चंद्र
लहानसाच हात धरून जेव्हा लवकैश माझ्याजवळ आला,
"मोठे पप्पा, हे घे ना!" म्हणत खेळण्यातला छोटा ट्रक दाखवला,
त्या क्षणी समजलं — नातं केवळ रक्ताचं नसतं,
ते हक्काच्या मिठीत, आणि त्या निरागस विश्वासात असतं।
खुशराजचं ते मनमोकळं हसणं,
जेव्हा त्याच्या शर्टावर चॉकलेट सांडलं आणि म्हणाला,
"मोठे पप्पा, काही नाही, पुन्हा धुवून दे ना,"
तेव्हा माझ्या हृदयात उमटलं एक निर्व्याज प्रेमाचं झरा।
तनिष जेव्हा संध्याकाळी दारात धावत येतो,
"आज मला मोठे पप्पांसोबत जेवायचंय!" असं ठामपणे म्हणतो,
तेव्हा घरातल्या जेवणातही येतो एक वेगळाच स्वाद,
कारण त्याच्या डोळ्यांत असतो माझ्या
अस्तित्वावरचा हक्काचा बंध जिवाळ्याचा संवाद।
आणि आर्या — गोड, नाजूक, मनमोहक हास्य घेऊन येते,
"मोठे पप्पा, गोष्ट सांगा!" म्हणत मिठीत विसावते,
मी सांगतो ती राजकुमारीची गोष्ट, पण ती माझ्यासाठीच असते,
कारण त्या क्षणात मी एक परीकथेचा राजा होतो —
तिच्या डोळ्यांत मला गवसलेलं एक स्वप्न असतं।
हे लहान जीव जेव्हा माझ्याकडे हक्काने वस्तू मागतात,
तेव्हा मी फक्त देतो वस्तू नाही,
तर देतो त्यांना आठवणी, आधार,
आणि माझ्या आयुष्याचा एक हसरा भाग,
ज्यांच्या आठवणीने मन भरून येतं —
अगदी शांत, समाधानी, निर्मळ।
हे सारे क्षण आहेत माझ्या आयुष्याची खरी संपत्ती,
मी मोठा झालो त्यांच्या 'मोठेपणात',
त्या छोट्या हाकांमध्ये, त्या निरागस स्पर्शांत,
मी पुन्हा लहान होतो — 'मोठे पप्पा' या नावात।
माझे तीन रत्न — जान्हवी, विलक्षा आणि गुजल,
त्यांच्यातच आहे माझ्या आयुष्याचं खरे आभूषण।
जान्हवी — समजूतदार, आईसारखी प्रेमळ,
विलक्षा — हुशार, हसरी, घरात गोडवा फुलवणारी।
गुजल — माझा आधार, उमेदीचा दीप,
त्यांच्या अस्तित्वातूनच उमटते माझं जीवनगीत।
आणि या सर्व नात्यांच्या गाठींमध्ये गुंफलेला मी —
प्रविण लक्ष्मण काकुस्ते,
कैलासवासी लक्ष्मण लोटन यांचा पुत्र —
त्यांचा अभिमानाचा वारसा जपणारा एक सजग पथिक,
प्रेम, जबाबदारी, आणि ऋणानुबंध जपणारा एक साधा माणूस,
प्रत्येकाने दिलं जे मोलाचं प्रेम,
त्याचीच ही कविता एक नम्र अभिव्यक्ती,
माझ्या आयुष्याच्या प्रत्येक पानावर तुमचं नाव आहे
हीच माझी खरी संपत्ती।
माझं आयुष्य आहे तुमच्या मुळे सुंदर,
प्रेमाचा, आधाराचा हाच खरा वरदानाचा हुंकार।
हे ऋण शब्दात मावणार नाही,
पण मनापासून 'धन्यवाद'।

--------------------------------
**लेखक: जान्हवी आणि विलक्षा**

# नांदेड़ जिल्ह्यात धर्मग्रंथांवर आधारित पुस्तक प्रचार मोहीम

गणेश कदम
नांदेड तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

२५/०५/२०२५ रोजी जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्या अनुयायांनी, भगवद्गीता, गुरु ग्रंथ साहिब, कुराण शरीफ आणि बायबल या प्रमुख धर्मग्रंथांच्या सिद्ध ज्ञानावर महाराष्ट्रात व्यापक प्रमाणावर केले. रविवारी विविध बाजार, गावे तसेच घरोघरी पोहोचून शेकडो श्रद्धाळू या पुस्तकांचे वितरण करताना दिसले. भाविकांनी लोकांना ग्रंथ वाचण्याचे महत्त्व समजावून सांगत त्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आग्रह धरला. संत रामपाल जी महाराज यांच्या आहेत. अनेकांनी वाईट सवयी सोडून शुद्ध व सदाचारी जीवनाचा मार्ग स्वीकारला आहे. या उपक्रमाचा प्रमुख हेतू म्हणजे आध्यात्मिक अज्ञान व गैरसमज दूर करून शुद्ध, आध्यात्मिक ज्ञानाचा समाजात प्रचार करणे तसेच एक सुसंस्कृत, सदाचारी व समतावादी समाज घडविणे हा असा दृढ विश्वास या शिष्यवृंदाने व्यक्त केला. या आधीही महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये संत रामपाल जी महाराज यांच्या अनुयायांनी धार्मिक ग्रंथांचे वितरण करून लोकांमध्ये आध्यात्मिक जागृती घडवली आहे. या पुस्तकांच्या वाचनामुळे लोकांना केवळ



आधारित ज्ञान गंगा, जीने की राह आणि गीता तेरा ज्ञान अमृत या आध्यात्मिक पुस्तकांचे प्रचार व वितरण नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण अनुयायांचे म्हणणे आहे की, या पवित्र ग्रंथांच्या वाचनामुळे लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आले आहे. कायद्याच्या चौकटीत राहून योग्य ज्ञानाच्या प्रसारानेच समाजातील वाईट प्रवृत्ती व अंधश्रद्धा नष्ट होऊ शकतात, आत्मिक शांती व समाधान मिळते असे नाही, तर जीवनात शिस्त, नीतिमत्ता आणि चारित्र्य या मुल्यांचीही रुजवणूक होते.

## महायुतीचे 'बिल्डर हिताय, बिल्डर सुखाय' धोरण ?

# एसटीच्या तीन मध्यवर्ती कार्यशाळा बंद करण्याचा सरकारचा घाट

### 700 कामगारांच्या अन्यत्र बदल्या करण्याच्या हालचाली

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------

एसटी महामंडळाच्या तीन मध्यवर्ती कार्यशाळा बंद करण्याचा घाट सरकारने घातल्याचे उघडकीस येत आहे. एसटी बसेस बांधणीचे काम होत असलेल्या कार्यशाळांतील जवळपास ७०० कामगारांच्या अन्य विभागांत बदल्या करण्याचा निर्णय एसटीच्या महाव्यवस्थापकांनी घेतला आहे. कार्यशाळांच्या जागांवर डोळा ठेवून बिल्डरांच्या हितासाठी हा निर्णय घेतल्याची -चर्चा आहे. एसटीच्या मूळ अस्तित्वावर * घाला



एसटी महामंडळाला खासगीकरणाचे ग्रहण लावले जात आहे. याचे परिणाम कामगार वर्गाबरोबर राज्यातील जनतेलाही भोगावे लागणार आहेत.
हिरेन रेडकर, सरचिटणीस, महाराष्ट्र एसटी कामगार सेना

घालण्याच्या या निर्णयाला तत्काळ स्थगिती द्यावी, अशी मागणी करीत महाराष्ट्र एसटी कामगार सेनेने याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे.एसटी महामंडळाच्या स्थापनेपासून पुणे-दापोडी, छत्रपती संभाजीनगर-चिकलठाणा आणि नागपूर-हिंगणा येथील मध्यवर्ती कार्यशाळांमध्ये भक्कम बसेस बांधणीचे काम केले जात आहे. तिन्ही कार्यशाळांमधून अडीच हजारांपर्यंत कामगारांना रोजगार उपलब्ध होत होता. हे कामगार दरमहा ११० बसेसची बांधणी करीत आहेत. पुणे दापोडी, छत्रपती संभाजीनगर चिकलठाणा आणि नागपूर हिंगणा या भागांत वेगाने औद्योगिक प्रगती झाली आहे. या शहरांत एसटी कार्यशाळांसाठी सध्या वापरात असणाऱ्या ८४ एकर जमिनी मोडीत निघणार आहेत. खासगीकरण आणि बिल्डरांच्या हितासाठी हा निर्णय घेतला जात आहे.

# केरऴ, तामिऴनाडू, कर्नाटकला मान्सूनचा रेड अलर्ट, गोवा-महाराष्ट्रातही अलर्ट

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------------------

मान्सून अखेर केरळमध्ये दाखल झाला असल्याची घोषणा भारतीय हवामान विभागाने (IMD) केली आहे. आठ दिवस आधीच मान्सूनने केरळमध्ये दाखल झाल्याने राज्यासह देशासाठी सुखावणारी आणि दिलासादायक बातमी आहे. केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटकला मान्सूनने घेरलं असून आज (25 मे) तिन्ही भागात पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागात पुढील 7 दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. कोकण, गोव्यातील बहुतांश ठिकाणांसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पूर्वमोसमी पावसाची शक्यता आहे. यात रायगड, पुणे, कोल्हापूर, नांदेड, लातूर, चंद्रपूर आणि नागपूर भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना व विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पावसाची शक्यताही हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे या सात जिल्ह्यांना ऑरेंज



अलर्ट देण्यात आला आहे.

**अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना फटका**

मे महिन्यात झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. राज्यातल्या जवळपास 85 तालुक्यांमध्ये अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना फटका बसला आहे. तब्बल 22 हजार 233 हेक्टर क्षेत्र अवकाळी पावसामुळे बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मका, ज्वारी, भाजीपाला, संत्रा, भात, आंबा, फळपिके या पिकांचे अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका हा अमरावती, जळगाव, नाशिक, चंद्रपूर आणि जालना या जिल्ह्यांना बसल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, मान्सून गोव्याच्या वेशीवर दाखल झाला असून, पुढील दोन दिवसातच मान्सून महाराष्ट्रात धडकणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. तर आज देखील राज्यातील बहुतांश भागात पावसाचे ढग कायम असल्याचे बघायला मिळत आहेत. आज रविवारी, मुंबई आणि मुंबई उपनगरासह ठाण्यात पावसाच्या तुरळक सरी कोसळत आहे. मुंबईत आज पहाटेपासून आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केली आहे. दक्षिण मुंबई आणि उपनगर परिसरात सध्या पावसाच्या जोरदार सरी बरसत आहेत. ठाण्यातही पावसाचे आगमन झाले आहे.

# PASSWORD PROTECTED PAGE